ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# आर्थिक विकासात मानव संसाधनाची भूमिका

**प्रा.डॉ.अजयकुमार रामदास इंगळे**
समर्थ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भाडणे, ता.साक्री, जि.धुळे

**प्रस्तावना:-** विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. विकास या प्रक्रियत मानवी तसेच अमानवी घटकाचा समावेश होतो. विकास प्रक्रियेला चालना देण्याचे काम भौतिक तसेच अभौतिक घटक करीत असतात. देशाच्या विकासात्मक प्रक्रियेत सामाजिक, आर्थिक व राजकीय तसेच सर्व पर्यावरणीय बाबींचा समावेश होत असतो. सर्व घटक विकासामध्ये एकमेकांशी निगडीत असतात.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. समाजातच सर्व गरजा भागवल्या जातात. “गरज” च्या मध्यमातून नवनविन शोध लागले. तंत्रे, माहिती उदयास आली व त्यातूनच नवनविन साधनांचा तत्राची आवश्यकता वाटू लागली व यातूनच विनिमयाची प्रक्रिया चालू होते. लोकांनी वेळ, पैसा, श्रम आणि साधने यांची निवड करुन प्रभावीपणे त्याचा वापर कसा करावा हे आपल्याला आर्थिक विकास प्रक्रियेत बघावे लागेल.

**आर्थिक विकास:-**

1. Economic development is the sustained, concerted action of policy makers and communities that promote the standard of living and economic helth of specific area.
2. Economic development is a quantitative and qualitative change in the economic which is involved multiple area as development of human capital, critical infrastructure regional, competiveness envormental sustainability social inclusion health staffs and litterer

3. “दिर्घ कालावधीमध्ये अर्थव्यवस्थेच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याच्या प्रक्रियेता आर्थिक विकास म्हणतात” **मेयर बाल्डबिन**

4. “आर्थिक विकास हा देशाच्या आर्थिक प्रगतीच्या प्रयत्नांचा एक भाग असुन त्यात आधिक उत्पादनासाठी तांत्रिक व संस्थात्मक बदल अभिप्रेत असतात.”

**- प्रा.किंडले**

आर्थिक विकास संकल्पनेत राहणीमान उंचावणे, उत्तम आरोग्यमय वातावरण प्रदान व विविध साधनांचा वापर करुन आर्थिक विकास घडवून आणणे.

थोडक्यात आर्थिक विकास म्हणजे प्रत्येक स्तरावरील व्यक्तींच्या व पर्यायाने देशाच्या उत्पादनात वाढ होणे होय.

**मानव संसाधन विकास** :- देशाच्या विकासामध्ये ज्याप्रमाणे नैसर्गिक संसाधनाचा मोलाचा वाटा असतो. त्याचबरोबर त्या देशातील मानवी घटकाला देखील तेवढेच महत्व आहे. देशाची लोकसंख्या किती आहे यापेक्षा ती किती क्रियाशिल आहे हे महत्वाचे आहे. देशातील लोकांनी चांगले कौशल्य संपादन केले असतील, सुशिक्षित असतील तर त्या देशाची लोकसंख्या कमी किंवा जास्त असो यामुळे काहीच फरक पडत नसुन उलट त्या माध्यमातून विकासच घडून येतो.

“समाजातील सर्व नागरीकांच्या ज्ञानात , कौशल्यात आणि क्षमतांमध्ये वाढ करण्याची प्रक्रिया म्हणजे विकास होय.”- **होर्बिसन आणि चार्लस्.**

“Human resource development is the frame wand for helping employees to develop their personal and organizational skills, knowledge, and abilities.”

एकूणच व्यक्तीच्या व्यक्तीगत आणि संगठनात्मक कौशल्य, ज्ञान व क्षमता यांच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरेल, असा आराखडा होय.

**आर्थिक विकासात मानव संसाधनाची भूमिका** :- मानव संसाधन म्हणजे व्यक्तीच्या ज्ञान, कोशल्य व क्षमता यांच्यात वाढ करुन त्यांचा उपयोग देशाचा आर्थिक, राजकीय व

सामाजिक विकासासाठी करुन घेणे होय. मानव संसाधन हे मानवामधील गुंतवणुक आणि विकासाशी संबंधित घटक आहेत ज्यामुळे मानवाचा उत्पादक व नाविण्यपूर्ण असा साधन म्हणून उपयोग होतो.

प्रत्येक देशाच्या विकासात त्या देशातील मानव संपत्ती, तीची गुणवत्ता या बाबींचा मोलाचा वाटा असतो. गुणवत्ता खालील बाबींवरुन मोजता येते.

१. देशातील नागरिकांची शैक्षणिक पातळी.

२. शिक्षक, वैज्ञानिक व वैद्यकिय क्षेत्र इत्यादी उच्च दर्जाचे व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींचे लोकसंख्येतील प्रमाण

३. देशातील साक्षरतेचे प्रमाण

एकंदरीत "शिक्षण" हा महत्वाचा घटक विकासात अंर्तभूत आहे.

मानव संसाधन विकास व आर्थिक विकास हे एकमेकांशी परस्परावलंबीत घटक आहे. कारण मानव संसाधन विकासामुळे उत्पादन क्षमता वाढते. उत्पादन क्षमता वाढली की आर्थिक विकास घडून येतो. यावरुन आपण म्हणू शकतो की मानव संसाधन विकास हा आर्थिक विकासाला चालना देत असतो. भांडवली गुंतवणुकीला मानवी क्रयशक्तीची जोड दिल्याशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. मानवी घटकांचा परिणाम देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासावर घडलेला आपणास दिसून येतो.

देशाच्या आर्थिक विकासात मानव संसाधनाची भूमिका खालील मुद्यांवरुन अधिक स्पष्ट करता येईल.

**श्रमशक्तीचा योग्य वापर**:- वस्तुच्या उत्पादनप्रक्रियेत भूमि, श्रम, भांडवल आणि संयोजन हे चार घटक अत्यंत महत्वाचे आहेत. यामध्ये श्रम या घटकाला विशेष महत्व आहे. कारण उत्पादन प्रक्रिया सुरु करणे व ती सतत सुरु ठेवणे हे श्रमशक्तीचे महत्वाचे कार्य आहे. श्रम हा एक गतिशिल घटक आहे. श्रमशक्तीच्या योग्य वापरामुळे आर्थिक विकास शक्य होत असतो.

**नैसर्गिक साधनांचा वापर** :- मनुष्य त्याच्या जिज्ञासा प्रवृतीच्या आधारे निसर्गात असलेल्या विविध गोष्टींचा वापर करुन त्याच्या दैनंदिन जीवन सुकर व सुलभ होण्यासाठी वापर करुन होत असतो यातूनच आर्थिक विकासाची प्रक्रिया घडून येते.

**श्रमाचा योग्य वापर :-** देशाच्या लोकसंख्येवर श्रमाचा पुरवठा अवलंबुन असतो. श्रमाचा पुरवठा हा मनुष्य बळावरच अवलंबुन असतो. म्हणजेच आवश्यक त्या प्रमाणात क्रियाशील श्रम पुरवठा करणारा घटक या नात्याने मानवी संसाधनांचे महत्व सांगितले जाते.

**सृजनशीलतेस मदत :-** देशाच्या आर्थिक विकासात नवनवीन सृजनशिल विचारांना अतिशय महत्व आहे. या सृजनशिल विचारातूनच पुढे संशोधन जन्मास येते. देशाच्या वेगवेगळ्या स्तरावर विकास घडवून आणण्यासाठी नवनवे शोध, नविन पध्दती, तंत्रज्ञान, कौशल्य यांचा शोध घेणे आवश्यक असते. या संशोधनातूनच देशाचा आर्थिक विकास त्याचबरोबर सर्वांगिण विकास शक्य होतो.

**उत्पादन उपभोक्ता यांचे परस्परावलंबन** :- मनुष्याच्या गरजा या अफाट आहेत त्या गरजा पुर्ण करण्यासाठी अनेक वस्तुंची पूर्तता करावी लागते. परंतु या पुर्ततेबरोबरच ती वस्तु वापरण्यासाठी मुबलक प्रमाणात उपभोक्ताही असणे आवश्यक असते. त्यामुळे देशातील मनुष्यबळ हे उत्पादक म्हणून तर काम करतेच पण उपभोक्ता म्हणुनही महत्वाची भूमिका बजावत असते. यातूनच आर्थिक विकास साध्य होत असतो.

**संरक्षणातील भूमिका** :- कोणत्याही देशाचा आर्थिक विकास उच्चांक हा वाढवावयाचा असेल तर देशात शांतता व स्थैर्य असणे महत्वाचे असते. त्यामुळे देशात अंतर्गत संरक्षण हे त्या देशातील उपलब्ध असलेल्या मनुष्यबळावरच अवलंबून आहे. तेवढेच बाह्य संरक्षण पण पर्याप्त मनुष्यबळावरच अवलंबून आहे. त्याव्दारे परकीय आक्रमणापासून वाचवता येते व या माध्यमातून देशाचे स्थैर्य टिकवता येते.

**समारोप** :- अशाप्रकारे आर्थिक विकासात मानव संसाधनाची भूमिका स्पष्ट करता येईल. देशाच्या सर्वांगिण विकास घडवून आणावयाचा असेल तर त्यासाठी मानव संसाधनाची भूमिका अतिशय महत्वाची आहे. व्यक्ती आणि राष्ट्र यांच्या जीवनात मानव संसाधन

विकास अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे आपली लोकसंख्या अतिशय वाढली आहे असा नकारात्मक सूर न आवळता त्या लोकसंख्येचा वापर विधायक कार्यासाठी कसा करता येईल व त्या माध्यमातून देशाचार आर्थिक व पर्यायाने सर्वांगिण विकास कसा करता येईल याचा विचार होणे आतिशय गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ** :-


१. अहिरे, बोन्दार्डे (१९९२), ‘‘शिक्षणाचे अर्थशास्त्र’’ नूतन प्रकाशन पुणे.

२. चव्हाण एम.एल.(२००९), ‘‘भारतीय अर्थव्यवस्था’’ प्रशांत पब्लीकेशन जळगांव.

३. डॉ.भंगाळे शैलजा, डॉ.महाजन संगिता(२०१३), ‘‘शिक्षण आणि विकास’’ प्रशांत पब्लीकेश, जळगांव.

४. डॉ.भोसले रमा, डॉ.डोणे उज्वला (२००९), ‘‘शिक्षणातील बदलते विचारप्रवाह’’ फडके प्रकाशन कोल्हापूर.

५. अकोलकर ग.वी.(१९६६),‘‘शिक्षण आणि राष्ट्रीय विकास’’शारदा प्रकाशन पुणे